४७५४

जिल्हा स्तरावर लघु उद्योगांना देण्यात
येणाऱ्या पुरस्काराची रक्कम ठरविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शासन निर्णय क्र.लउधो-२००५/(८३१२)/उद्योग-७
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १८ सप्टेंबर २००६

वाचा :-
1) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक (क्र.५०/१९८५) क्र.एसएसआय-पी/डिस्ट्रीक्ट-ॲवॉर्डस-५०/८५/सी-७/६८२, दि.४/७/१९८५
2) उद्योग संचालनालयाचे परिपत्रक (क्र.२१/१९८६) क्र.एसएसआय-पी/डिस्ट्रीक्ट-ॲवॉर्डस-४९/८६/सी-२२०००, दि.२०/५/१९८६
3) उद्योग संचालनालयाचे पत्र क्र.लउधो-जिपुरा/१९९०/२००६/अे-२७३२७, दि.४/९/२००६

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये उद्योग क्षेत्रात असामान्य कामगिरी करणाऱ्या लघु उद्योजकांकरिता शासनातर्फे जिल्हा बक्षिस योजना राबविण्यात येते. त्यानुसार सन १९८५-८६ पासून जिल्हा लघु उद्योग पुरस्कार म्हणून प्रथम क्रमांकास रु.५,०००/- व द्वितीय क्रमांकास रु.३,०००/- देण्यात येतात. याऐवजी ही पुरस्काराची रक्कम प्रथम क्रमांकास रु.१५,०००/ व द्वितीय क्रमांकास रु. १०,०००/- अशी वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. तसेच, पुरस्काराच्या सोहोळ्यासाठी स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, निमंत्रण पत्रिका इत्यादी येणाऱ्या खर्चासाठी रुपये ५,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्याचाही प्रस्ताव विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

राज्यामध्ये उद्योग क्षेत्रातील असामान्य कामगिरी करणाऱ्या लघु उद्योजकांकरिता शासनातर्फे जिल्हा बक्षिस योजना राबविण्यात येते. त्यानुसार जिल्हा लघु उद्योग पुरस्कार म्हणून प्रथम क्रमांकास रु.५,०००/- व द्वितीय क्रमांकास रु.३,०००/- देण्यात येतात. याऐवजी ही पुरस्काराची रक्कम प्रथम क्रमांकास रु.१५,०००/ व द्वितीय क्रमांकास रु. १०,०००/- प्रदान करण्याचा याद्वारे शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच, या पुरस्काराच्या सोहळ्यानिमित्त स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ, निमंत्रण पत्रिका इत्यादी येणाऱ्या खर्चासाठी रुपये ५,०००/- इतकी रक्कम मंजूर करण्याचाही शासनाने निर्णय घेतलेला आहे.

उद्योग संचालनालय
महाराष्ट्र शासन
००५१०१
दिनांक 25 SEP 2006

B2 5719

२.     सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पात याकरिता मागणी क्र.के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघु उद्योग, १०२, लघु उद्योग, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००) (०६) जिल्हा पातळीवर लघु उद्योजकांना पुरस्कार (२८५१०४६९) या लेखाशिर्षांतर्गत तरतूद करण्यात आली आहे.

३.     पुरस्काराची रक्कम वाढविल्यामुळे येणारा अधिक आर्थिक खर्च रु.२,९१,०००/- (रुपये दोन लाख एक्क्याणव हजार फक्त ) हा मागणी क्र.के-७, २८५१, ग्रामोद्योग व लघु उद्योग, १०२, लघु उद्योग, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००) (०३) औद्योगिक प्रदर्शनामध्ये व व्यापार जत्रेत भाग घेणे (२८५१०३९८) मधील तरतुदीतून सन २००६-०७ च्या अर्थसंकल्पित तरतुदीतून उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.आरईइ-२८५१/२००६-०७/ (८८६८)/प्रशासन-१, दिनांक १८ सप्टेंबर २००६-अन्वये पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४.     सदर शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३९४/०६/व्यय-१६, दिनांक १८/९/२००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(न.वि. पाटील)
कार्यासन अधिकारी

प्रत,

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व सह संचालक, (उद्योग)
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
नियोजन विभाग (१४५५), मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, (व्यय-१६), मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (प्रशासन-१), उ. ऊ. व का. वि., मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (उद्योग-७)